नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com

लातूर कृषी हवामान सल्ला **मंगळवार, दिनांक – १९.०१.२०२१**

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक २० ते २४ जानेवारी,२०२१)				
दिनांक	२०/०१	२१/०१	२२/०१	२३/०१	२४/०१
पाऊस	०.०	०.०	०.०	०.०	०.०
कमाल तापमान (अं.से.)	३१.०	३२.०	३१.०	३१.०	३२.०
किमान तापमान (अं.से.)	१८.०	१७.०	१७.०	१६.०	१६.०
ढग स्थिती (आकाश)	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	अंशतःढगाळ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	५३	५१	३९	३१	२७
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	२९	२६	२३	२७	१७
वा-याचा वेग (किमी / तास)	११	१०	९	८	८
वा-याची दिशा	दक्षिण	ईशान्य	ईशान्य	पूर्व	अगनेय

हवामानाचा इशारा	हवामान अंदाजानूसार जिल्हयात पुढील पाच दिवस आकाश स्वच्छ राहील.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
हरभरा	फुले लागणे ते घाटे लागणे अवस्था	हरभरा पिकात घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी ५ % (एनएसकेई) निंबोळी अर्क किंवा क्विनॉलफॉस २५ % इसी २० मीली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ % ४.५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. हरभरा पिकात उपलब्धतेनुसार व पिकाच्या आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे.
करडई	फुलधारणा	करडई पिकात माव्याचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोट ३० % १३ मीली किंवा असिफेट ७५ % १० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. करडई पिकात उपलब्धतेनुसार व पिकाच्या आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे.
ऊस	वाढीची अवस्था	नवीन लागवड केलेल्या उस पिकाला १ ते १.५ महिना झाल्यानंतर नत्र खताची मात्रा दिली नसल्यास ३० किलो प्रती हेक्टर नत्र खताची मात्रा द्यावी.
संत्रा/मोसंबी	फुलधारणा अवस्था	आंबे बहार मोसंबी बागेत ५००:५००:५०० ग्राम प्रती झाड नत्र, स्पुरद व पालाश व आंबे बहार संत्रा बागेत ४००:४००:४०० ग्राम प्रती झाड नत्र, स्पुरद व पालाश खताची मात्रा देऊन बागेत पाणी व्यवस्थापन करावे.
डाळिंब	फुलधारणा अवस्था	आंबे बहार डाळींब बागेत ३२५:२५०:२५० ग्राम प्रती झाड नत्र, स्पुरद व पालाश खताची मात्रा देऊन बागेत पाणी व्यवस्थापन करावे .
चिकू	वाढीची	चिकू बागेत पाणी व्यवस्थापन करावे.
फुल शेती	वाढीची	फुल पिकात तण नियंत्रण करून पाणी व्यवस्थापन करावे.

भाजीपाला	वाढीची अवस्था	कांदा पिकात करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी डायफेन्कोनॅझोल २५% ईसी १० मीली प्रती १० लिटर पाण्यात स्टीकरसह मिसळून फवारणी करावी. मिरची पिकात भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी मायक्लोब्युटनिल १०% डब्लूपी १० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
चारा पिके	वाढीची	रब्बी हंगामात पेरणी केलेल्या चारा पिकात पाणी व्यवस्थापन करावे.
पशुधन व्यवस्थापन	--	मुरघास तयार करण्यासाठी योग्य पिकाची कापणी पिक फुलोऱ्यात असताना तसेच एकदल तृणधान्ये चारापिकाच्या कणसातील दान्यामध्ये दुध भरण्याच्या अवस्थेत करावी.मुरघास तयार करण्यासाठी एकदल तृणधान्य चारापिके ज्यामध्ये विद्राव्य शर्करा/कर्बोदके यांचे प्रमाण जास्त असते (म्हणजे त्यांचे कांडे चावल्यावर गोड लागते) अशी चारापिके योग्य मानली जातात.
सामुदायिक विज्ञान		स्वयंपाक करण्यासाठी सुर्यचुलीचा वापर करून इंधन बचत करता येते.

सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.